सत्यमेव जयते

*महाराष्ट्र शासन-कृषी विभाग*

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**

३०-बी आर्केड, जागतीक व्यापार केंद्र, कफ परेड,मुंबई-५

दुरध्वनी-कार्या.-०२२ २२१६३३५१/२ इ-मेल-pmu@mahapocra.gov.in

---

जा.क्र. नादेकृसंप्र/मृदाविज्ञान/२३४/२०१८ दिनांक-२३ जुलै,२०१८

**प्रति-**

**जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी**

**औरंगाबाद / जालना / बीड / जळगाव / लातूर / उस्मानाबाद / परभणी /हिंगोली / नांदेड / अमरावती / अकोला / बुलडाणा / वाशीम / यवतमाळ / वर्धा**

**विषय- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड मार्गदर्शक सुचना सन २०१८-१९**

**संदर्भ:-** १) कृषी व पदुम विभागाकडील शा.नि. क्र.हअप्र-०७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष दिनाकं: १७-०१-२०१८
२) कृषी व पदुम विभागाकडील शा.नि. क्र. राफयो-२०१८/प्र.क्र.४७/९-अे दिनांक: ०६ जुलै, २०१८
३) सूकाणू समिती सभा दिनांक-१ जून २०१८ चे मंजूर इतिवृत्त शासन पत्र क्र.कृषिवि३७१६/प्र.क्र.४२ भाग-१/८-अ दिनांक-१८.६.२०१८

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखिल सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनामार्फत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे. वातावरणातील कर्ब वायूचे वाढलेले प्रमाण हा हवामान बदलाशी निगडीत असलेला महत्वाचा घटक आहे. या कर्ब वायूचे स्थिरीकरण (Carban Sequestration) करण्याच्या प्रक्रियेमध्ये वृक्षांची (फळबागांची) लागवड अतिशय प्रभावी ठरते. शेतक-यांच्या आर्थिक उन्नती बरोबरच हवामान बदलास कारणीभूत ठरणा-या कर्ब वायूंचे स्थिरीकरण करणे, हा ही या प्रकल्पाचा एक उद्देश आहे.

सदर नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत प्रकल्प जिल्ह्यातील प्रथम टप्प्यातील निवडलेल्या गावामध्ये फळबाग लागवड हा मंजूर घटक राबविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. सर्वसाधारण सुचना-

१.१ प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई हे प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड या घटकाकरिता राज्य स्तरावरील संनियंत्रक आहेत. क्षेत्रीय पातळीवर कृषि विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांनी प्रकल्पांतर्गत सुचनाप्रमाणे या प्रकल्प घटकाची अमंलबजावणी करावी.

१.२ प्रकल्पांतर्गत खालील नमूद बहुवार्षिक फळपिकांच्या लागवडीसाठी राज्याच्या "भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या मार्गदर्शक सुचना सन २०१८-१९" नुसार अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील, तथापि फळपिके निश्चीत करतांना "राज्याच्या कृषि-हवामान क्षेत्रानुकूल असणाऱ्या फळांच्या व त्यांच्या प्रजातींच्या -कलमांच्या' लागवडीसाठी अर्थसहाय्य देय राहील".

१.३ प्रकल्पांतर्गत फळबाग लागवडीचा कालावधी माहे मे ते नोव्हेंबर असा राहील. सदर फळबाग लागवडीची व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी प्रथम टप्प्यातील प्रकल्प गावामध्ये भिंतीपत्रके ग्राम पंचायतीचे/गावाचे नोटीस बोर्डवर लावण्यात यावीत. भिंती पत्रकांचा नमुना सॉफ्ट प्रतीमध्ये प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयास उपलब्ध करुन दिला जाईल. त्याप्रमाणे जिल्हा/उपविभाग स्तरावर छपाई करुन घेऊन पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच वेळोवेळी गावस्तरावर होणा-या बैठका/मेळावे/भेटी व्दारे सदर प्रकल्प घटकाचा प्रचार करण्यात यावा. प्रकल्पांतर्गत इच्छूक लाभार्थ्यांकडून प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने निश्चित केलेल्या अनुदान मागणी अर्ज नमुन्यामध्ये संबधित गावाचे ग्राम कृषी संजीवनी समितीकडे अर्ज मागविण्यात यावेत.

१.४ संबधित प्रकल्प गावाच्या ग्राम कृषी संजीवनी समितीकडे प्राप्त झालेल्या मागणी अर्जाची छाननी संबधित समूह सहाय्यक व कृषी सहाय्यक यांनी करुन लाभ घेण्यास पात्र व अपात्र अशा शेतक-यांची यादी समितीसमोर लाभार्थी निवडी साठी सादर करावी.

१.५ नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत फळबाग लागवडीसाठी प्राप्त झालेल्या मागणी अर्जापैकी पात्र शेतक-यामधून प्रकल्पांतर्गत लाभार्थी निवडीच्या मार्गदर्शक सुचनानुसार समितीने प्राधान्य क्रमाने लाभार्थी निवड करुन यादी संबधित उपविभागीय कृषी अधिकारी यांचे कडे ठराव प्रतीसह सादर करावी.

१.६ यासाठी प्रत्येक गावाकरिता त्या गावाचे प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने मंजूर केलेल्या सविस्तर प्रकल्प आराखड्यातील प्रथम वर्ष (सन २०१८-१९) करिता मंजूर केलेल्या फळपिकनिहाय क्षेत्रास अधिन राहून लाभार्थी निवड करावी.

१.७ प्रल्पांतर्गत वृक्ष आधारित खालील बहुवार्षिक फळबागांच्या लागवडीसाठी ३ वर्ष कालावधीत प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षी अनुक्रमे ५०%, ३०% व २०% या प्रमाणात अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

| **योजनेतर्गत लागवडीसाठी पात्र फळपिके ( कलमे)** |
|---|
| १. आंबा २. डाळींब ३. पेरु ४. सिताफळ ५. आवळा ६.कागदी लिंबू ७. संत्रा ८. मोसंबी |

**१.८** फळबाग लागवडीसाठी निवड झालेल्या पात्र शेतक-यांना नजीकच्या कृषी विज्ञान केंद्रावर फळबाग लागवडीबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.

१.९ सदरचा घटक फक्त नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या प्रथम टप्प्यातील गावामध्येच राबविणेत यावा.

१.१० फळबाग लागवडीपूर्वी सदर क्षेत्रातील माती परिक्षण करण्यात यावे.

**२. अर्थसंकल्पीय तरतुदीची उपलब्धता:**

प्रकल्पांतर्गत सदर घटक राबविण्यासाठी सन २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षाच्या कालावधीत प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाकरिता प्रकल्पांतर्गत मंजूर निधीमधून अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

**३. क्षेत्र मर्यादा :**

३.१. प्रकल्पांतर्गत फळबाग लागवडीकरिता प्रति शेतकरी कमाल २ हेक्टर पर्यंत लाभ अनुज्ञेय राहील. एकूण २ हे किंवा त्या पेक्षा कमी जमीन धारणा असलेल्या शेतक-यांची निवड या प्रकल्पामध्ये करावी. प्रकल्पामध्ये लाभार्थी शेतक-यांची निवड सदर कमाल क्षेत्र मर्यादेत लाभार्थी त्याच्या इच्छेनुसार एका पेक्षा जास्त फळ पिके लागवडीकरिता देखील पात्र राहील.

३.२. प्रकल्प गावातील ज्या शेतक-यांना २ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रावर लाभ घ्यावयाचा आहे, त्या शेतक-यांना राज्य शासनाच्या "भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड " योजनेमधून २ हेक्टरवरील क्षेत्राकरिता लाभ घेता येईल.

३.३. लाभधारकाचे ७/१२ च्या नोंदणीनुसार जर तो संयुक्त खातेदार असेल तर त्यांच्या संयुक्त खात्यावरील ८- अ मधील त्याचे नावे असलेल्या क्षेत्रामर्यादा (२ हे.) पर्यंत लाभ देण्यात यावा. एकूण २ हे. पेक्षा जास्त जमीन धारणा असलेल्या शेतक-यांची निवड फळबाग लागवड या घटकासाठी करु नये.

३.४. प्रकल्प घटकाकरिता निवड झालेल्या लाभार्थ्याने यापूर्वी राज्य रोजगार हमी योजना वा क्षेत्र विस्ताराच्या अन्य योजनेंतर्गत फळबाग लागवडीकरिता शासकीय अनुदानाचा लाभ घेतला असल्यास, सदर लाभ घेतलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी लाभार्थी पात्र राहतील ( २ हे. या कमाल मर्यादेतून यापूर्वी लाभ घेतलेले क्षेत्र वगळावे).

**४. लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकर्ष :**

४.१ प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ देण्यात यावा, संस्थात्मक लाभार्थ्यांना लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

४.२ शेतकऱ्याच्या स्वत:च्या नावे ७/१२ उतारा असणे आवश्यक आहे तथापि, जर लाभार्थी ७/१२ उताऱ्यावर संयुक्तपणे खातेदार असेल तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडीसाठी संमतीपत्र बंधनकारक राहील.

४.३ लागवड करावयाच्या फळपिकासाठी ठिबक सिंचन संचाची उभारणी करण्याकरिता लाभार्थ्याकडे पाणी पुरवठ्याचा स्त्रोत व आवश्यक सुविधा असावी.

४.४ जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास, ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना राबविण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक राहील.

४.५ या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांच्या मालकीची किमान २० गुंठे शेत जमीन असणे बंधनकारक राहील.

४.६ प्रथम अत्यल्प भूधारकामधील अ.जा, अ.जमाती, महिला व दिव्यांग या क्रमाने अर्जदार शेतक-यांची निवड करावी. या वर्गवारीतील अर्जदार शेतक-यांची निवड पूर्ण झालेनंतर अल्पभूधारकामधील अनु.जाती, अनु. जमाती, महिला शेतकरी व दिव्यांग शेतकरी या प्राधान्यक्रमाने ग्राम कृषी संजीवनी समितीने लाभार्थी निवड करावी. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड करताना ज्यांची उपजीविका पूर्णतः शेतीवर अवलंबून आहे अशा शेतकऱ्यांची प्राधान्याने निवड करावी.

## ५. घटकांतर्गत समाविष्ट बाबी :

५.१ प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड या घटकांतर्गत पुढील बाबींचा समावेश राहील तसेच, त्यापैकी शेतकऱ्यांनी स्व-खर्चाने करावयाची कामे व प्रकल्प अनुदानीत बाबी पुढीलप्रमाणे राहतील

| बाब / कामे | आर्थिक भार |
|---|---|
| **अ. शेतकऱ्यांनी स्व-खर्चाने करावयाची कामे** | |
| १) जमीन तयार करणे<br>२) माती व शेणखत / सेंद्रिय खत मिश्रणाने खड्डे भरणे<br>३) रासायनिक खत वापरुन खड्डे भरणे<br>४) आंतर मशागत करणे<br>५) काटेरी झाडांचे कुंपण (ऐच्छिक) | १००% लाभार्थी शेतकरी |
| **ब. प्रकल्प अनुदानीत बाबी / कामे** | |
| १) खड्डे खोदणे<br>२) कलमे लागवड करणे<br>३) पीक संरक्षण<br>४) नांग्या भरणे<br>५) ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | १००% नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प |

५.२ उपरोक्त तक्त्यातील **अ** मधील अ.क्र. १ ते ४ येथील बाबींची कामे लाभार्थी शेतकऱ्यांनी स्व-खर्चाने करावयाची असून यामधील अ.क्र. ५ येथील बाब शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक स्वरुपाची राहील तसेच, सदर तक्त्यातील **ब** मधील अ.क्र. १ ते ५ येथील बाबींकरिता शेतकऱ्यांना प्रकल्प निधीतून १००% अनुदान देण्यात येईल.

५.३ लाभार्थ्यांना फळपिक निहाय व त्यांच्या लागवडीच्या अंतरानुसार शासनाचे ज्या बाबींना अनुदान देण्यात येणार आहे त्याचा तपशील या सोबत **परिशिष्ट - अ** येथे नमूद केलेला आहे.

५.४ या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ठिबक सिंचन संचाच्या उभारणीकरिता १००% अनुदान द्यावयाचे आहे. त्याकरिता ठिबक सिंचन संच उभारणीसाठी असलेल्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत प्रचलित मापदंडानुसार प्रकल्प निधीतून अनुदान देण्यात यावे.

५.५ उपरोक्त बाबींपैकी प्रकल्पाने अर्थसहाय्य करावयाच्या बाबींकरिता मापन पुस्तक ठेवण्यात यावे, सदर बाबींकरिता कृषि सहाय्यकाने लाभार्थी शेतकऱ्यांसाठी फळबाग लागवडीचे अंदाजपत्रक तयार करावे व त्याप्रमाणे प्रत्यक्षात होणाऱ्या कामाची वेळोवेळी मापन पुस्तिकेत नोंद घ्यावी.

६. **आर्थिक मापदंड :**

६.१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रचलित मापदंडानुसार भाऊसाहेब फुंडकर योजनेमध्ये फळबाग लागवडीसाठी ज्या बाबी करिता शासकिय अनुदान द्यावयाचे आहे त्याचे मापदंड प्रकल्पांतर्गत लागवड होणा-या फळबाग घटकासही लागू राहतील. त्यानुसार दरवर्षी सदर मापदंड अद्ययावत करण्यात येतील.

६.२. ठिबक सिंचन संचाकरिता प्रचलित केंद्र पुरस्कृत योजनेच्या मापदंडानुसार (सद्यस्थितीत PMKSY - Per Drop More Crop) १००% अनुदानाची परिगणना करण्यात यावी.

६.३. राज्यस्तरीय समितीने निश्चित केलेले कलमांचे / रोपांचे दर लागू होतील.

६.४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत निश्चित केलेल्या मजूरीच्या दरांमध्ये, प्रधान मंत्री कृषि सिंचन योजनेच्या (अथवा प्रचलित केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन संच उभारणी योजना) मापदंडामध्ये तसेच, कृषि आयुक्तालयाने निश्चित केलेल्या सामुग्रींच्या दरामध्ये सुधारणा झाल्यास, या योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या प्रकल्प अनुदानीत बाबींचे दर त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारीत करण्यात येतील.

७. **प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्य:**

७.१. या योजनेंतर्गत लाभार्थ्यास एकूण ३ वर्षाच्या कालावधीत ५०:३०:२० प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

७.२. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये लागू असणारे कलमांचे दर प्रकल्पांतर्गत लागवड करावयाच्या कलमांनाही लागू राहतील.

७.३. लाभार्थ्याने लावलेली फळ झाडे पहिल्या वर्षी किमान ८०% व दुसऱ्या वर्षी किमान ९०% जगविणे आवश्यक राहील. त्यानुसार फळझाडे जगविण्याचे प्रमाण न राखल्यास, लाभार्थी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीच्या अनुदानास पात्र असणार नाही.

७.४. प्रतिवर्ष देय असलेले अनुदान लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करावे तथापि, लाभार्थ्याने कलमे शासकीय रोपवाटिकेतून अथवा राज्यातील कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिकेतून घ्यावायचे निश्चित केल्यास त्यांना परवाना देण्यात यावा व कलमे खरेदी करून लागवड केल्यानंतर सदर बाबीचे अनुदान थेट संबंधित संस्थाना अदा करावे.

७.५. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत फळपिक निहाय तसेच, पिकांमधील अंतरानुसार खर्च व अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आली असली तरी प्रत्यक्ष खर्च जर मापदंडानुसार निश्चित केलेल्या खर्चापेक्षा कमी आला असेल तर लाभार्थ्यांना प्रत्यक्ष खर्चाएवढेच अनुदान अनुज्ञेय राहिल.

८. **भौतिक लक्षांक:**

८.१ प्रकल्पांतर्गत फळपिकांच्या लागवडीकरिता शेतकऱ्यांना स्थानिक कृषि-हवामान परिस्थिती नुसार येणाऱ्या मंजूर फळ पिकांच्या व त्यांच्या प्रजातींच्या लागवडीचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. संबधित गावाकरिता फळबाग लागवडीचे उद्दिष्ठ् हे त्या गावाच्या मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालातील फळपिकनिहाय मंजूर क्षेत्रा इतके राहील. प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून मंजूर करण्यात आलेल्या डीपीआर मधील वार्षीक कृती आराखड्यातील फळपिकांची लागवड या बाबीखालील क्षेत्र भौतिक लक्षांक म्हणून घ्यावे.

८.२ ज्या गावामध्ये अद्याप सुक्ष्म नियोजन प्रक्रिया संपन्न झालेली नाही,अशा गावा करिता प्रति गाव १० हेक्टर क्षेत्र लक्षांक घेण्यात यावेत. तसेच फळपिकासाठी अंतरानुसार देय असलेले अनुदान विचारात घेऊन त्याप्रमाणे आर्थिक लक्षांक घ्यावेत. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना एकापेक्षा जास्त फळ पिकांची लागवड करण्यास मुभा राहील.

८.३ सविस्तर प्रकल्प अहवालातील भौतिक लक्षांका इतके अर्ज प्राप्त न झाल्यास पुनश्च: इच्छुक लाभार्थ्यांचे अर्ज मागवून निवड करण्यात यावी. अशाप्रकारे, दुसऱ्यांदा संधी देवूनही लक्षांकाएवढे अर्ज प्राप्त न झाल्यास, ग्राम कृषी संजीवनी समितीने सदरचा निधी (फळबाग या घटकावरील) प्रकल्पांतर्गत अन्य मंजूर व तांत्रिक दृष्ट्या योग्य अन्य घटकावर प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या पूर्व मान्यतेने वर्ग करावा.

## ९. लाभार्थी निवडीची कार्यपद्धती :-

९.१ पुरेशी प्रसिद्धी देऊन इच्छूक शेतकऱ्यांचे अर्ज मागविण्यात यावेत.

९.२ सदर योजनेबाबत गावपातळीवर ग्राम सभाद्वारे प्रचार व प्रसार करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सूचना द्याव्यात, जेणेकरुन योजनेची माहिती ईच्छूक शेतकऱ्यापर्यंत पोहचण्यास मदत होईल.

९.३ कृषि-हवामान क्षेत्रानुकूल असणाऱ्या फळ पिकांपैकी सविस्तर प्रकल्प अहवाल व प्रकल्पांतर्गत मंजूर असलेल्या कोणत्याही पिकाची योजनेंतर्गत अनुज्ञेय किमान व कमाल क्षेत्र मर्यादेपर्यंत लागवड करण्याची शेतकऱ्यांना मुभा राहील.

९.४ इच्छूक शेतकऱ्यांना अर्ज करण्याकरिता १६ ऑगस्ट पर्यंतचा कालावधी देण्यात द्यावा. प्रकल्पाने विहित केलेला सोबत नमुना ब प्रमाणे मागणी अर्ज घ्यावा.

९.५ गावाच्या मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालातील फळपिके व क्षेत्रमर्यादेच्या अधिन राहून ग्राम कृषी संजीवनी समितीने पात्र लाभार्थ्यांची निवड करावी.

## १०.पूर्वसंमती प्रदान करणे:

१०.१.लाभार्थ्यांस पूर्वसंमती देण्यापूर्वी संबंधित कृषि सहाय्यकांनी लाभार्थ्याच्या प्रस्तावीत लागवड क्षेत्रास भेट देऊन पाहणी करावी. कृषी सहाय्यक यांनी प्रस्तावित क्षेत्र हे प्रस्तावित केलेल्या फळपीक लागवडीसाठी तंत्रिक दृष्ट्या योग्य असलेल्या, पात्र शेतक-यांची निवड करणेसाठी यादी ग्राम कृषी संजीवनी समितीकडे सादर करावी.

१०.२.ग्राम कृषी संजीवनी समितीने निवड केलेल्या लाभार्थ्यांना उपविभागीय अधिकारी यांनी यादी प्राप्त झालेच्या दिनांकापासून २ दिवसाचे आत पूर्वसंमती प्रदान करावी तसेच, लाभार्थ्यांची शासकीय अथवा कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिकेतून कलमे उचल करण्याची इच्छा असल्यास (मागणी अर्जात या बाबीचा स्पष्ट उल्लेख असावा) त्यांना त्याप्रमाणे पूर्वसंमती सोबत परवाना देण्यात यावा.

१०.३.लाभार्थ्याने पूर्वसंमती मिळाल्याच्या दिनांकापासून ७५ दिवसांमध्ये सर्व बाबींसह फळबागेची लागवड करणे आवश्यक राहील.

१०.४.जे लाभार्थी पूर्वसंमती नंतर ७५ दिवसांत सर्व बाबींसह फळबागेची लागवड करणार नाहीत त्यांची पूर्वसंमती रद्द करण्यात यावी व प्रतीक्षा यादीतील पुढील क्रमानुसार पात्र लाभार्थ्यास मंजूरी प्रदान करावी.

**११. तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी :**

११.१.पूर्वसंमती प्रदान केलेनंतर कृषि सहाय्यकांनी शेत परिस्थितीनुरुप अंदाजपत्रक तयार करावे. सदर अंदाजपत्रकाची छाननी करुन तांत्रिक मान्यतेसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे शिफारशीसह पूर्वसंमती दिल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत सादर करण्याची जबाबदारी संबंधित कृषी सहाय्यकाची राहील.

११.२.प्रकल्पांतर्गत वार्षिक कृती आराखड्यास सुकाणू समितीने मान्यता प्रदान केलेली असल्यामुळे सदर प्रस्तावास पुन्हा प्रशासकिय मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. तथापि लागवडीखालील क्षेत्र हे सविस्तर प्रकल्प अहवालातील क्षेत्र मर्यादेत असावे. तसेच ज्या गावांमध्ये अद्याप सुक्ष्म नियोजन झालेले नाही; तेथे १० हेक्टर प्रति गाव या पेक्षा जास्त लक्षांक असणार नाही.

११.३.प्रत्येक लाभार्थीच्या जमिनीवरील फळबाग लागवड हा स्वतंत्र प्रकल्प समजण्यात येईल. अशा प्रत्येक प्रकल्पासाठी तांत्रीक मान्यता स्वतंत्रपणे देण्यात यावी. लागवड करावयाच्या फळझाड व क्षेत्रानुसार प्रकल्पांतर्गत मंजूर केलेल्या मापदंडाप्रमाणे स्वतंत्रपणे अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक आहे.

११.४.लाभार्थ्याच्या २ हेक्टर क्षेत्र मर्यादेत फळबाग लागवडीच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यास उप विभागीय कृषि अधिकारी हे सक्षम प्राधिकारी राहतील, त्यांनी प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत तांत्रिक मान्यता प्रदान करावी.

११.५.लागवडीची अंदाजपत्रके तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच लाभार्थ्याने फळबागेची लागवड करावी.

११.६.तांत्रिक मंजूरी मिळाल्यानंतर लाभार्थ्याने फळबाग लागवडीची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी.

**१२. फळबाग लागवड व अनुदान वितरण :**

१२.१.लाभार्थ्याने फळबागेची लागवड केल्यानंतर त्याबाबतच्या नोंदी कृषी सहाय्यक यांनी वेळोवेळी मापन पुस्तिकेमध्ये घ्याव्यात. त्याचप्रमाणे, लागवड केलेले क्षेत्र जिओ-टॅगींग करण्यात यावे, त्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत ॲपची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. ॲपची सुविधा उपलब्ध होईपर्यंत लागवड क्षेत्राचे फोटो लॅट-लॉंग सह घेऊन जतन करुन ठेवावेत.

१२.२.फळबाग लागवडीची नोंद लाभार्थ्याच्या ७ / १२ उताऱ्यावर घेण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांनी लागवड पूर्ण होताच संबधित तलाठ्यास लेखी कळवावे व लेखी कळविल्याची पोहंच दप्तरी जतन करुन ठेवावी.

१२.३.पहिल्या वर्षी लाभार्थ्याने केलेल्या कामाच्या प्रमाणका नुसार मापन पुस्तिकेत नोंद घेऊन त्यास उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रमाणित करुन मापदंडा नुसार देय असलेले अनुदान लाभार्थ्यांना अदा करण्याची कार्यवाही करावी.

१२.४.लाभार्थ्याने लागवडी करिता लागणारी कलमे शासकीय रोपवाटिकेतून अथवा राज्यातील कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिकेतून घेतली असल्यास सदर बाबीचे अनुदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने थेट संबंधित संस्थेस त्यांच्या बँक खात्यावर अदा करावे आणि अन्य बाबींचे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करावे.

१२.५.लाभार्थ्याने कलमे खरेदी राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिकेतून केल्यास शासकीय अनुदानाची रक्कम व देयकाची रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान लाभार्थ्यास देण्यात यावे.

१२.६.जिवंत झाडांची विहीत प्रमाणातील टक्केवारी राखण्याची जबाबदारी संपूर्णपणे लाभार्थ्याची असेल.

## १३. संनियंत्रण, मूल्यमापन व लेखापरीक्षण:

१३.१.राज्य स्तरावरून प्रकल्प व्यवस्थापन कक्षाव्दारे सदर योजनेचे संनियंत्रण करण्यात येईल तसेच, क्षेत्रीय पातळीवर योजनेची अंमलबजावणी करताना विविध स्तरावरील अधिकाऱ्यांनी संनियंत्रण (Concurrent Evaluation) करावे. झालेल्या कामाची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे विविध स्तरीय अधिका-यांच्या तपासणीचे प्रमाण खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

| कार्यालय स्तर | | तपासणीचे प्रमाण |
|---|---|---|
| प्रकल्प व्यवस्थापन कक्ष | - | १ टक्के |
| जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | - | ५ टक्के |
| उपविभागीय कृषी अधिकारी | - | १० टक्के |
| कृषी सहाय्यक | - | १०० टक्के |
| समूह सहाय्यक | - | ३० टक्के |

१३.२ सदर योजनेंतर्गत झालेल्या कामाचे दस्तऐवज वार्षिक लेखा परीक्षणासाठी जतन करून ठेवावेत व ते लेखा परीक्षणास उपलब्ध करुन द्यावेत.

## १४. गुणवत्तापूर्ण कलमांचा पुरवठा :

१४.१ लाभार्थ्याने फळबाग लागवडीकरिता कलमची निवड स्वत: करावयाची असून, शासकिय अथवा विद्यापीठाकडील रोपवाटीकेतून खरेदी परवान्यावर अथवा स्वखर्चाने खरेदी करावयाची असून त्यांनी कलमे खरेदी करताना खालीलप्रमाणे रोपवाटिकांना प्राधान्य द्यावे -

i. कृषि विभागाच्या रोपवाटिका
ii. कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिका
iii. राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिका

१४.२ लाभार्थ्याने, राष्ट्रीय बागवानी मंडळामार्फत मानांकित खाजगी रोपवाटिकेतून कलमांची खरेदी केल्यास त्यांच्या दर्जाबाबतची जबाबदारी लाभार्थ्याची राहील. अशा प्रकरणी लाभार्थी शेतक-यांने खरेदी केलेल्या कलमांचे अनुदान लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करावे.

**१५. प्रशासकिय खर्च:**

प्रकल्पांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणा-या प्रकल्प घटक ड अंतर्गत आकस्मिक बाबीवरील खर्च या सदराखालील निधीतून अत्यावश्यक हँडबिल / फॉर्म, मापन पुस्तिका इत्यादी छपाई, फळझाड लागवडी विषयी प्रसिध्दी पुस्तके, स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी, प्रचार व प्रसिद्धी, मूल्यमापन, स्टेशनरी इ. साठी खर्च करता येईल. प्रशासकिय बाबींवर करण्यात येणारा खर्च हा संबंधित अधिकाऱ्यांना असणाऱ्या वित्तीय अधिकारानुसार करावा.

१६. अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र-

१७. प्रकल्पांतर्गत घटकाच्या प्रगती कामकाजाचा मासिक प्रगती अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये दरमहा प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर करावा. तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडील लेखा शाखेने दिलेल्या नमुन्यात सादर करावे.

**( विकास चंद्र रस्तोगी)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,मुंबई**

**प्रत:- माहितीस्तव सादर**

१. अपर मुख्य सचिव, कृषी , महाराष्ट्र राज्य , मंत्रालय , मुंबई - ३२

२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

# परिशिष्ट-अ

( नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत फळबाग लागवडी करिता मार्गदर्शक सुचना दि. २० जुलै, २०१८ सोबतचे परिशिष्ट)

## गोषवारा

### प्रकल्प अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

(मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये॰ आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | फळ पिक कलमे / नारळ रोपे | अंतर (मी.) | हेक्टरी झाडे | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | आंबा | ५ x ५ | ४०० | ३००४४ | ५८९१४ | **८८९५८** | १४८ | ४६६९ | ५०५० | **९७१९** | २३ | ३०४५ | २५० | **३२९५** | १५ | ३७७५८ | ६४२१४ | **१०१९७२** | १८६ |
| २ | डाळींब | ४.५ x३ | ७४० | २८०१४ | ६४९९९ | **९३०१३** | १३८ | ५६८४ | ५९५५ | **११६३९** | २८ | ४०६० | ७७५ | **४८३५** | २० | ३७७५८ | ७१७२९ | **१०९४८७** | १८६ |
| ३ | पेरू | ३ x २ | १६६६ | ३८५७० | १४०९८६ | **१७९५५६** | १९० | ३६५४ | १६७५० | **२०४०४** | १८ | २०३० | १०० | **२१३०** | १० | ४४२५४ | १५७८३६ | **२०२०९०** | २१८ |
| ४ | पेरू | ६ x ६ | २७७ | ११९७७ | ४४४८४ | **५६४६१** | ५९ | १८२७ | २८५० | **४६७७** | ९ | १०१५ | १०० | **१११५** | ५ | १४८१९ | ४७४३४ | **६२२५३** | ७३ |
| ५ | संत्रा | ६ x ३ | ५५५ | १९४८८ | ६४३३४ | **८३८२२** | ९६ | ५६८४ | ५८५० | **११५३४** | २८ | ४०६० | ३०० | **४३६०** | २० | २९२३२ | ७०४८४ | **९९७१६** | १४४ |
| ६ | संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू | ६ x ६ | २७७ | १२९९२ | ४१९१४ | **५४९०६** | ६४ | २८४२ | २५०० | **५३४२** | १४ | २०३० | ३०० | **२३३०** | १० | १७८६४ | ४४७१४ | **६२५७८** | ८८ |
| ७ | सिताफळ | ५ x ५ | ४०० | १५२२५ | ५०८६४ | **६६०८९** | ७५ | १८२७ | ३४०० | **५२२७** | ९ | १०१५ | २०० | **१२१५** | ५ | १८०६७ | ५४४६४ | **७२५३१** | ८९ |
| ८ | आवळा | ७ x ७ | २०० | ९७४४ | ३६००८ | **४५७५२** | ४८ | १४२१ | १६७५ | **३०९६** | ७ | ८१२ | ७५ | **८८७** | ४ | ११९७७ | ३७७५८ | **४९७३५** | ५९ |

# तक्ता - १ : आंबा कलमे (सघन लागवड)

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी ४०० (अंतर ५ X ५ मी.)

(मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६x०.६x०.६ मी. आकार एकूण खड्डे ४०० | १९८९४ | ० | **१९८९४** | ९८ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | **१९८९४** | **०** | **१९८९४** | **९८** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ६० / प्रति कलम, संख्या-४०० | ८१२० | २४००० | **३२१२०** | ४० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | **८१२०** | **२४०००** | **३२१२०** | **४०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | १६२४ | ४८०० | **६४२४** | ८ | ० | ० | **०** | ० | **१६२४** | **४८००** | **६४२४** | **८** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३४६६४ | **३४६६४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | **०** | **३४६६४** | **३४६६४** | **०** |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | २५० | **२२८०** | १० | ३०४५ | २५० | **३२९५** | १५ | ३०४५ | २५० | **३२९५** | १५ | **८१२०** | **७५०** | **८८७०** | **४०** |
| **एकूण** | | **३००४४** | **५८९१४** | **८८९५८** | **१४८** | **४६६९** | **५०५०** | **९७१९** | **२३** | **३०४५** | **२५०** | **३२९५** | **१५** | **३७७५८** | **६४२१४** | **१०१९७२** | **१८६** |

# तक्ता – २ : पेरु कलमे (सघन लागवड)

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - १६६६ (अंतर - ३ X २ मी.)

(मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.३x०.३x०.३ मी. आकार एकूण खड्डे १६६६ | २४३६० | ० | **२४३६०** | १२० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | २४३६० | ० | **२४३६०** | १२० |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ५० प्रति कलम, संख्या-१६६६ | १२१८० | ८३३०० | **९५४८०** | ६० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | १२१८० | ८३३०० | **९५४८०** | **६०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | १६२४ | १६६५० | **१८२७४** | ८ | ० | ० | **०** | ० | १६२४ | १६६५० | **१८२७४** | **८** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ५७५८६ | **५७५८६** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ५७५८६ | **५७५८६** | ० |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | १०० | **२१३०** | १० | २०३० | १०० | **२१३०** | १० | २०३० | १०० | **२१३०** | १० | ६०९० | ३०० | **६३९०** | **३०** |
| **एकूण** | | **३८५७०** | **१४०९८६** | **१७९५५६** | **१९०** | **३६५४** | **१६७५०** | **२०४०४** | **१८** | **२०३०** | **१००** | **२१३०** | **१०** | **४४२५४** | **१५७८३६** | **२०२०९०** | **२१८** |

# तक्ता – ३ : पेरु कलमे

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - २७७ (अंतर - ६ X ६ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६ x ०.६x०.६ मी. आकार एकूण खड्डे २७७ | ६९०२ | ० | **६९०२** | ३४ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ६९०२ | ० | **६९०२** | ३४ |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ५० प्रति कलम, संख्या-२७७ | ४०६० | १३८५० | **१७९१०** | २० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ४०६० | १३८५० | **१७९१०** | **२०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | ८१२ | २७५० | **३५६२** | ४ | ० | ० | **०** | ० | ८१२ | २७५० | **३५६२** | **४** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३०५३४ | **३०५३४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३०५३४ | **३०५३४** | ० |
| ५ | पीक संरक्षण | १०१५ | १०० | **१११५** | ५ | १०१५ | १०० | **१११५** | ५ | १०१५ | १०० | **१११५** | ५ | ३०४५ | ३०० | **३३४५** | **१५** |
| **एकूण** | | **११९७७** | **४४४८४** | **५६४६१** | **५९** | **१८२७** | **२८५०** | **४६७७** | **९** | **१०१५** | **१००** | **१११५** | **५** | **१४८१९** | **४७४३४** | **६२२५३** | **७३** |

# तक्ता - ४ : डाळिंब कलमे

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - ७४० (अंतर - ४.५ X ३ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.३x०.३x०.३ मी. आकार एकूण खड्डे ७४० | १८६७६ | ० | **१८६७६** | ९२ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | १८६७६ | ० | **१८६७६** | **९२** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ३५ प्रति कलम, संख्या-७४० | ७३०८ | २५९०० | **३३२०८** | ३६ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ७३०८ | २५९०० | **३३२०८** | **३६** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | १६२४ | ५१८० | **६८०४** | ८ | ० | ० | **०** | ० | १६२४ | ५१८० | **६८०४** | **८** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३८८२४ | **३८८२४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३८८२४ | **३८८२४** | ० |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | २७५ | **२३०५** | १० | ४०६० | ७७५ | **४८३५** | २० | ४०६० | ७७५ | **४८३५** | २० | १०१५० | १८२५ | **११९७५** | **५०** |
| **एकूण** | | **२८०१४** | **६४९९९** | **९३०१३** | **१३८** | **५६८४** | **५९५५** | **११६३९** | **२८** | **४०६०** | **७७५** | **४८३५** | **२०** | **३७७५८** | **७१७२९** | **१०९४८७** | **१८६** |

# तक्ता - ५ : संत्रा / मोसंबी / कागदी लिंबू कलमे-

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - २७७ (अंतर - ६ X ६ मी.) (मजूरी, सामुग्री व एकूण -रुपयांमध्ये' आणि श्रमिक दिन -संख्येमध्ये)

| अ क्र | बाब | वर्ष पहिले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन | मजूरी | सामुग्री | एकूण | श्रमिक दिन |
| १ | खड्डे खोदणे, ०.६x ०.६x०.६ मी. आकार एकूण खड्डे २७७ | ६९०२ | ० | **६९०२** | ३४ | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ६९०२ | ० | **६९०२** | **३४** |
| २ | कलमे लागवड करणे, किंमत रु. ४० प्रति कलम, संख्या-२७७ | ४०६० | ११०८० | **१५१४०** | २० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ४०६० | ११०८० | **१५१४०** | **२०** |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | **०** | ० | ८१२ | २२०० | **३०१२** | ४ | ० | ० | **०** | ० | ८१२ | २२०० | **३०१२** | **४** |
| ४ | ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे | ० | ३०५३४ | **३०५३४** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ० | **०** | ० | ० | ३०५३४ | **३०५३४** | **०** |
| ५ | पीक संरक्षण | २०३० | ३०० | **२३३०** | १० | २०३० | ३०० | **२३३०** | १० | २०३० | ३०० | **२३३०** | १० | ६०९० | ९०० | **६९९०** | **३०** |
| **एकूण** | | **१२९९२** | **४१९१४** | **५४९०६** | **६४** | **२८४२** | **२५००** | **५३४२** | **१४** | **२०३०** | **३००** | **२३३०** | **१०** | **१७८६४** | **४४७१४** | **६२५७८** | **८८** |

## तक्ता – ६ : संत्रा कलमे (इंडो-इस्राईल पद्धत)

### नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत अनुदानीत बाबींचे प्रति हेक्टरी मापदंड : सन २०१८-१९

कलमे संख्या प्रति हेक्टरी - ५५५ (अंतर - ६ X ३ मी.)

